REGISTERED No. B 3434.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ३० जुलै १९४७ अंक ३१





'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

रामतीर्थ ब्राह्मी तेल



[ स्पेशल नं. १ ]
सर्वत्र मिळतो.
पांढरे केस काळे होतात. स्मरणशक्ति वाढते. टक्कलावर केंस उगवतात. शांत झोंप येते. दृष्टि सुधारते. केंस लांबसडक होतात. केसांची नीट निगा राखते. डोकेंदुखी थांबते.
मोठी बाटली रु. ३-८-०, लहान बाटली रु. २-८-०
रामतीर्थ योगाश्रम, ४४८ सॅण्डर्स्ट रोड, मुंबई ४

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणं दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळं बिस्किटांकरतां लागणारा योग्य, तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांना देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें !

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

# विविध माहिती

**रेल्वेजच्या विभागणीच्या परिणामाची भीति**—नॉर्थ वेस्टर्न रेल्वे आणि बंगाल आसाम रेल्वे ह्यांच्या विभागणीमुळें उतारूंच्या आणि मालाच्या वहातुकींत अडथळे उत्पन्न होऊन गैरसोय उत्पन्न होण्याची भीति निराधार असल्याचें मध्यवर्ती सरकारनें जाहीर केलें आहे. विभागणीमुळें गाड्यांच्या वेळांत कांहींही बदल होणार नाहींत, अगर तिकिट-विक्रीच्या पद्धतींत व दरांतही कांहीं फरक होणार नाहीं.

**ब्रिटननें कर्जांतील आणखी रक्कम उचलली**—अमेरिकेनें ब्रिटनला दिलेल्या कर्जांतून ब्रिटननें आणखी १० कोटी डॉलर्सची उचल केली. पुढील महिन्याच्या प्रारंभापर्यंत अधिक रक्कम न उचलण्याचें ठरलें होतें. परंतु नुकत्याच केलेल्या ह्या उचलीमुळें ब्रिटनच्या खात्याचे डॉलर्स पुढील वर्षाच्या मध्याच्या पूर्वींच संपण्याची भीति उत्पन्न झाली आहे.

**बुभुक्षितांची गवतावर गुजराण**—चीनमधील कँटंग प्रांतांत नुकताच जो जलप्रलय झाला त्यांत सांपडल्यामुळें बुभुक्षित झालेल्या लोकांना अन्न मिळेपर्यंत गवत खाऊन राहण्याची पाळी आली आहे.

**ब्रिटनमधील वीजगृहें**—ब्रिटनमधील वीजगृहांची पुनर्घटना करण्याचें प्राथमिक काम सुरू करण्यांत आलें आहे. ह्या कामाला ७½ कोटी पौंड खर्च येणार आहे. ब्रिटनमधील विजेची मागणी दरवर्षी ७ लाख किलोवॅटस् इतक्या गतीनें वाढत आहे. आज ब्रिटनमध्यें ५० लाख किलोवॅटस् वीज निर्माण करूं शकणारीं ६३ वीजगृहें तयार होत आलीं आहेत.

**परदेशी धंदेवाल्यांची सोय**—'इंटरनॅशनल बिझिनेस सर्व्हिस' ह्या नांवाचा एक क्लब आणि कचेरी लंडनमध्यें स्थापन झालीं आहेत. ह्या संस्थेच्या सभासदांसाठी माहितीखातें, दुभाषे, वाचनालय, इत्यादींची सोय करण्यांत आली आहे. परदेशांत व्यापार-व्यवहार करणाऱ्या धंदेवाल्यांनाच संस्थेचे सभासद होता येणार असून, वार्षिक वर्गणी २५ पौंड ठेवण्यांत आलेली आहे. संस्थेकडे बरींच चौकशीपत्रें आलीं व येत आहेत.

**आर. ए ची पहिली परीक्षा**—मार्च, १९४७ मध्यें रजिस्टर्ड अकौंटंटस्च्या पहिल्या परीक्षेस बसलेल्या उमेदवारांतील यशस्वी महाराष्ट्रीय उमेदवारांचीं नांवें:—

(१) श्री. वसंत पांडुरंग बागडथे. (२) श्री. प्रेमशंकर मोरेश्वर कोपरकर. (३) श्री. श्रीधर त्रिंबक कोरके. (४) श्री. सदाशिव नरहर ठेले. (५) श्री. दामोदर शंबा लोटलीकर. (६) श्री. कृष्णाजी वामन मेहेंदळे. (७) श्री. बलवंत श्रीपाद वैद्य (८) श्री. एम. भास्कर किनी.

**चीनची लोकसंख्या**—चिनी सरकारच्या शिरगणती खात्यानें चीनची लोकसंख्या ४६,१०,०६,२७५ असल्याचें जाहीर केलें आहे. त्यापैकीं, २४,१४,८५,५५५ पुरुष असून, २१,९५,२०,७२० स्त्रिया आहेत.

**वेजेस कोर्टांतील पहिलाच दावा**—सुंदरदास सॉ मिल्स आणि तेथील कामगार संघ ह्यांचेमध्यें वांधा निर्माण झाला, तेव्हां दोघांच्या संमतीनें एक पंच नेमण्यांत आला. पंचानें आपला निवाडा दिला, परंतु तो अमलांत आणण्यास मालकांनीं नकार दिला, असें समजतें. निवाडा अमलांत यावा ह्यासाठी संघाच्या चिटणिसांनीं मुंबई येथील पेमेंट ऑफ वेजेस कोर्टांत दावा आणण्याचें ठरविलें आहे. पंचाचा निवाडा अमलांत आणण्यासाठी असा प्रकारचा दावा अद्याप हिंदुस्थानांत कोठेंहि लावला गेलेला नाहीं.


## दि बँक ऑफ औंध लि.

(औंध संस्थानांत स्थापन झालेली–भागीदारांची जबाबदारी नियमित)

**रजिस्टर्ड ऑफिस:—औंध**

—: मुख्य बिझिनेस ऑफिस:—

१११।११२ सदाशिव पेठ, सातारा शहर.

**–औंध संस्थानांतील शाखा–**

आटपाडी, चिचूद रे. स्टे. व ओगलेवाडी.

- चालू, मुदतीच्या व सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.
- तीन वर्षे मुदतीचीं कॅश सर्टिफिकेटस् विकत मिळतात.
- योग्य तारणावर कॅश क्रेडिटस्, कर्जें व ओव्हर ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठीं समक्ष अगर पत्रद्वारें चौकशी करा.

वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

## मलेरियाचा कर्दनकाळ



मलेरियाचा कर्दनकाळ..

म्हणजेच जेमकोचें मेल्गो मिक्श्चर व गोळ्या. ह्या गोळ्या अगर मिक्श्चर घेतल्यामुळें थंडी वाजून ताप येणें, दोन चार दिवसांआड नियमित ताप येणें, तसेंच अंग व पोट दुखणें वगैरे विकारांचा समूळ नाश होतो.

जेमकोचे

मेल्गो




जे. अँड एम. को. फार्मसी लि. पनवेल

: स्टॉकिस्टस् :

[ १ ] श्री. एस्. सी. लिमये, सोलापूर

[ २ ] कांतिलाल हिरालाल, कोल्हापूर

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

बुधवार, ता. ३० जुलै, १९४७



प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे


## मतभेद आर्थिक कीं राजकीय ?

### युरोपांतील राष्ट्रांच्या ओढाताणीची पार्श्वभूमि

अमेरिकन परराष्ट्र मंत्री, मि. जॉर्ज मार्शल यांनीं युरोपियन राष्ट्रांच्या पुनघर्टनेसाठी जी आर्थिक योजना ब्रिटनला व फ्रान्सला पुढें करून सुचविली होती, तींत रशिआच्या कक्षेंतील आठ राष्ट्रांनीं भाग घेण्याचें नाकारलें आहे. ह्या आठ राष्ट्रांत पोलंड, झेकोस्लोव्हाकिआ, रुमेनिआ, बल्गेरिआ, हंगेरी, युगोस्लाव्हिआ, अल्बानिया आणि फिनलंड इतकीं राष्ट्रें आहेत. उलटपक्षीं, ब्रिटन-फ्रान्स पुरस्कृत अमेरिकन योजनेंत तीं दोन राष्ट्रें धरून सोळा राष्ट्रें सामील झालेलीं आहेत. वास्तविक मि. मार्शल ह्यांनीं अमेरिकन आर्थिक साह्याची नक्की रूपरेषा सांगितलेली नसून युरोपांतील प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र मदत करण्याऐवजीं सर्वांनीं मिळून एक कार्यक्रम तयार करावा, त्या कार्यक्रमाला शक्य ती मदत अमेरिका करील, इतकेंच जाहीरपणें सांगितलेलें आहे. मि. मार्शल यांच्या सूचनेप्रमाणें सोळा राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं काम चालू केलें असून ऑगस्ट अखेर सर्वांचा मिळून एक संयुक्त कार्यक्रम अमेरिकेला सादर करण्यांत येईल, अशी अपेक्षा आहे.

मि. मार्शल ह्यांनीं युरोपियन राष्ट्रांच्या पुनर्घटनेबाबत सुचविलेले उपाय मॉस्कोमधील परराष्ट्रमंत्र्यांच्या परिषदेंतूनच उगम पावलेले आहेत. ह्या परिषदेंत अँग्लो-अमेरिकन-फ्रेंच गट आणि रशिआ ह्यांच्यांतील मतभेद तीव्रतेनें पुन्हा एकदा पुढें मांडले गेले. मॉस्कोची परिषद यशस्वी झाली असें म्हणावयाचें असलें, तर ती मतभेद स्पष्ट, अगदी उघडपणें स्पष्ट होण्याइतकीच यशस्वी झाली, असेंच म्हणावें लागेल. परराष्ट्रमंत्र्यांची पुढील परिषद लंडन येथें नोव्हेंबरमध्यें भरणार आहे. त्यावेळीं प्रतिस्पर्धी पक्षांतील मतभेद अधिक विकोपास जातात कीं तडजोडीचा कांहीं मार्ग निघतो, हें दिसेलच. पण तूर्त तरी युरोपचे पूर्व युरोप आणि पश्चिम युरोप असे दोन भाग पडले, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

लंडनमधील 'ऑब्झरव्हर' हें पत्र मि. मार्शल ह्यांच्या युरोपयि मदत योजनेचा पुरस्कार करणारें आहे. ह्या पत्रानें योजनेसंबंधीं पुढील विचार व्यक्त केले आहेत. " जे देश ह्या संयुक्त युरोपिअन योजनेंत भाग घेतील त्यांना कांहीं प्रमाणांत आपलें आर्थिक स्वातंत्र्य गमवावें लागेल. संयुक्त योजनेच्या आराखड्याप्रमाणें आपलें आर्थिक जीवन नियंत्रित करण्याचें कबूल करणारे सर्व देश एकमेकांवर अवलंबून रहातील. आणि अखेर संयुक्त योजनेंत भाग घेणाऱ्या सर्व देशांना जकाती व चलन ह्याबाबत एकसूत्री कार्यक्रम मान्य करावाच लागेल. पूर्व युरोप आणि पश्चिम युरोप उत्पादनाच्या दृष्टीनें एकमेकांना पूरक आहेत; पश्चिम युरोपांत उद्योगधंदे आहेत, पूर्व युरोपांत अन्नधान्य आहे. तेव्हां पश्चिम युरोपनें एंजिनिअरिंग व तत्सम इतर उद्योगधंदे वाढवावे; आणि कुशल कारागिरी न लागणारे इतर उद्योगधंदे ज्या प्रदेशांत शेतकऱ्यांची बहुसंख्या आहे तेथें स्थापण्यांत यावे. " मार्शल योजनेला पाठिंबा देणाऱ्या एका जबाबदार वृत्तपत्राचे वरील विचार वाचून, पूर्व युरोपला मागसलेला ठेवण्याचा डाव मार्शल योजनेमागें दडलेला नाहीं ना ? अशी शंका आल्याखेरीज रहात नाहीं.

तथापि, हेतूच्या विश्लेषणाच्या मृगजळामागें न लागतां केवळ अर्थशास्त्राच्या दृष्टीनेंही या प्रश्नाचा विचार करतां येण्यासारखा आहे. मार्शल योजनेंत भाग घेणाऱ्या सोळा राष्ट्रांना, संयुक्त युरोपच्या मदतीचा कार्यक्रम तयार झाल्यावर अमेरिका जें कर्ज देणार, तें कांहीं अटींवरच देणार हें उघडच आहे. व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांत काय, अगर राष्ट्रांच्या आर्थिक व्यवहारांत काय, कर्जाच्या पाठोपाठ अटी ह्या येणारच, आणि त्यांत वावगेंही कांहीं नाहीं. रशिअन कक्षेंत गेलेल्या आठ राष्ट्रांतून कमी अधिक प्रमाणांत समाजवादी नियुक्त अर्थ व्यवस्था अंमलांत येत चाललेली आहे. ह्या अर्थ व्यवस्थेंत बँका, जमिनी, मोठे कारखाने, रेल्वेसारखीं वहातुकीचीं व दळणवळणाचीं साधनें इत्यादि खाजगी व्यक्तींच्या मालकीची रहात नाहींत. अर्थातच समाजवादी अर्थव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच बाध आणणाऱ्या अटी कर्ज देतांना अमेरिकेनें घातल्या असल्या तर त्या मान्य करणें ह्या राष्ट्रांच्या सरकारांना शक्यच नव्हतें. युरोपच्या मदतीच्या संयुक्त योजनेंत भाग घेतल्यानें आपल्या अर्थव्यवस्थेच्या पायालाच धक्का लागेल अशी भीति त्यांनीं वाटल्यामुळेंच त्यांनीं या योजनेंत भाग घेण्याचें नाकारलें असल्याचा दाट संभव आहे. 'ऑब्झरव्हर' मधील वर दिलेल्या उताऱ्यावरून आणखीही एक विचार सुचल्याखेरीज रहात नाहीं. औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या भांडवलशाही राष्ट्रांनीं मागासलेल्या राष्ट्रांना भांडवली स्वरूपाचा माल खुषीनें पुरविल्याचें उदाहरण जगाच्या आर्थिक इतिहासांत नाहीं. मार्शल योजनेबाबत खरा महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, युरोपांतील नेस्तनाबूद झालेल्या मुलग्राही महत्त्वाच्या उद्योगधंद्यांची पुनर्घटना करण्यासाठी तींत काय सोय आहे? अमेरिकन पक्क्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठींच ती आंखण्यांत येणार असेल तर युरोपला ती फार महागांत पडण्याचा संभव आहे आणि प्रे. ट्रूमन यांनीं मार्शल योजनेसंबंधीं नुकतेंच जें भाषण केलें त्यावरून बाजार पेठेच्या तर्काला पुष्टि मिळते. ह्या सर्व घडामोडींवरून असें दिसतें कीं, अमेरिका राजकारणासाठी व्यक्तिवादी अर्थशास्त्राचा उपयोग करीत आहे, तर सोव्हिएट रशिआ समाजवादी अर्थकारणासाठी राजकारणाचा उपयोग करीत आहे.

---

**मुंबईसाठी नगररचना तज्ज्ञ**—मुंबईतील वहातुकीची पहाणी करून नवीन रस्ते कोठे व कसे करावे ह्याविषयीं मुंबईच्या म्युनिसिपॅलिटीस सल्ला देण्यासाठी मि. अल्बर्ट मेयर नांवाचा अमेरिकन नगररचना तज्ज्ञ मुंबईला आला आहे. मि. मेयर ह्यांच्या मदतीला मि. कॉक्स, नांवाचा आणखीही एक तज्ज्ञ लवकरच येणार आहे.

**पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी, लि.**—भागीदारांना बोनस शेअर्स वाटण्यासाठी पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीला ८,४१,३०० रुपयांचें नवें भांडवल उभारण्याची परवानगी मिळाली आहे.

## डायरेक्टरांचे विविध प्रकार

" हिंदुस्थानांतील कंपनी डायरेक्टरांबाबत कायदा " ह्या विषयावर श्री. मेहोत्रा ह्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांत डायरेक्टरांचे खालील प्रकार उद्धृत केले आहेत. कंपनी डायरेक्टरांनीं आपण त्यांपैकीं कोणत्या सदरांत बसतो, हें पाहणें त्यांस बोधप्रद होईल.

**जन्मजात डायरेक्टर**—कांहीं लोक वयांत येतांक्षणींच आपल्या बापजाद्यांच्या कंपन्यांचे डायरेक्टर बनतात. त्यांची कायकी म्हणजे त्यांनीं आपल्या मातापितरांची निवड करण्यांत दाखविलेली चतुरता !

**' मम ' म्हणणारे डायरेक्टर**—ह्यांना अनुभव बेताचाच असतो, किंवा नसतोहि. मॅनेजिंग एजंट स्वतःच्या फायद्याच्या दृष्टीनें जें कांहीं सुचवितील, त्याला मान डोलावण्याचें ह्यांचें काम. कंपन्यांच्या कार्यास त्यांचा कांहींच हातभार लागत नाहीं. ज्यांचा उद्योगधंद्यांशीं कांहीं संबंध नाहीं अशा किताबवाल्या डायरेक्टरांची कंपन्यांच्या यशास आवश्यकता असते, हा लोकभ्रम मॅनेजिंग एजंट जाणतात. मोठ्या नांवांच्या खालीं लपून खोटेनाटे व्यवहार करण्यास त्यांना सवड मिळते.

**फीवाले डायरेक्टर**—आपण कंपनीचे जे शेअर घेतले आहेत त्यावर डायरेक्टरांचा मेहेनताना वगैरे धरून काय व्याज सुटतें त्याचा हिशेब ते नेहमी करीत असतात. त्यापलीकडे त्यांना कांहीं सुचत नाहीं. वरील जन्मजात किंवा मम म्हणणाऱ्या डायरेक्टरांसारखेच हे फीवाले डायरेक्टरहि निरुपयोगी असले तरी ते ज्यास्त हुशार व वस्ताद असतात. आपली फी बुडूं नये, ह्यासाठी ते खरोखरीच्या लायक डायरेक्टरांसाठी जागा खाली करून देण्यास तयार नसतात. त्यामुळें भागीदारांचें नुकसान होतें.

**मुद्दाम केलेले डायरेक्टर**—विशेष व्यवहारज्ञान, तज्ज्ञ माहिती, खास अनुभव, सामाजिक, व्यापारविषयक किंवा राजकीय अत्युच्च स्थान, विश्वासार्हता, इत्यादि गुणांसाठीं ज्यांचेवर डायरेक्टरशिप लादली जाते, असे हे डायरेक्टर असतात. ते बहुधा डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष असतात व दीर्घ दृष्टीनें आणि विशालबुद्धीनें ते मार्गदर्शन करतात.

**खरे, व्यवहारी डायरेक्टर**—कंपनीमध्यें खालच्या दर्जाच्या नोकरीपासून वरपर्यंत चढत जाणारे कार्यक्षम व मेहनती लोक खरे व्यवहारी डायरेक्टर होतात. किंवा, त्यांनीं प्रथम लहान प्रमाणावर धंदा सुरू करून तो वाढविलेला असतो. त्यांना धंद्याची पुरेपूर माहिती असते आणि पैशाच्या व्यवहाराशीं आणि बाजारभावांशीं त्यांचा निकटचा संबंध असतो.

---

### दि सांगली बँक लि., सांगली

३१–१२–१९४६ अखेर पुऱ्या झालेल्या बारामाहींत वरील बँकेस १,००,४०८रु. नफा झाला. त्यापूर्वींच्या वर्षी ५१,६७२रु. नफा झाला होता, आणि त्यापूर्वींच्या वर्षी नफ्याची रक्कम ३८,१६० रु. होती. भागीदारांना ७% + ४% असें ११% कर माफ डिव्हिडंड व बोनस मिळणार आहे. अहवालाच्या सालांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे बँकेनें आपलें भांडवल वाढवून तें २ लाखाचें ५ लाख करण्याचें ठरविलें ही होय. ही बँक लवकर शेड्यूल्ड बँक होईल. तिचेकडील ठेवींचा आंकडा ८७ लक्ष रु. असून खेळतें भांडवल १ कोटीचे वर गेलें आहे. श्री. पी. एस. मोकाशी हे बँकेचे आज दीर्घ काळ मॅनेजर आहेत. बँकेनें केलेल्या प्रगतीची माहिती " अर्था " मध्यें सालोसाल येत आहेच.

## सुप्रीम म्युच्युअलचें मूल्यमापन

सुप्रीम म्युच्युअल ॲ. कं. लि. चें ३१-१२-१९४६ अखेरचें पहिलें मूल्यमापन प्रो. जी. एस. दिवाण व प्रो. जी. एस. प्रियोळकर ह्या दोघा एम्. ए., एफ. आय. ए. ॲक्चुअरींनीं केलें आहे. कंपनीकडे अपेक्षेपेक्षां मृत्यूंचे क्लेम्स कमी आले. मूल्यमापन ३% व्याजाच्या आधारावर केलेलें आहे. कंपनीला पुढें कांहीं काळ ठोक व्याजाइतकें प्रत्यक्ष निवळ उत्पन्न मिळत राहील, मुदतीच्या ठेवींवरील व्याजाचा बोजा १९४७ अखेर नाहींसा होईल व त्यामुळें व्याजाचें निवळ उत्पन्न वाढेल, १९४७ अखेर २ लाखांचें सक्तीचें डिपॉझिट पुरें केलें म्हणजे इतर ठिकाणीं अधिक किफायतशीरपणें रकमा गुंतविण्यास वाव निर्माण होईल, इत्यादि गोष्टी वरील ३% चा दर ठरवितांना ॲक्च्युअरीद्वयांनीं विचारांत घेतल्या आहेत. गेलीं दोन वर्षें कंपनीनें १७% रिन्युअल खर्चांत व्यवहार केला आहे, हें विचारांत घेऊन अधिक सुरक्षिततेसाठीं ॲक्च्युअरींनीं येत्या पांच वर्षांसाठीं अनुक्रमें २१%,२०%,१९%,१८% व १७% असें क्रमशः उतरतें खर्चाचें प्रमाण गृहीत धरलें आहे. अर्थात्, १७% खर्चांत भागलें तर उत्तमच, परंतु तसें भागलें नाहीं तरी पुरेशा खर्चाची तरतूद मूल्यमापनांत करण्यांत आली आहे. अशा रीतीनें हिशेब करून, कंपनीच्या पॉलिसींच्या कराराच्या पूर्ण पूर्ततेची तजवीज करूनहि लाइफ फंडांत ४,६०० रु. वाढावा उरत आहे तो पुढें ओढण्यांत आला आहे.

वास्तविक पहातां प्रतिकूल परिस्थिति लक्षांत घेतां कंपनीच्या हिशेबांत साधारणतः तूटच यावयाची, परंतु सुप्रीम म्युच्युअल कॉलनीचे व्यवहारांत कंपनीनें २८,८३२ रु. नफा मिळविल्या कारणानें मूल्यमापन यशस्वी होऊं शकलें. असा नफा नेहमींच मिळत राहिला नाहीं, तरी खर्चहि भारी रहाणार नाहीं आणि व्याजहि ज्यास्त मिळत जाईल, असेंच गृहीत धरलें पाहिजे. त्याप्रमाणें योग्य त्या आधारावर केलेल्या मूल्यमापनामुळें कंपनीच्या प्रगतीस जोराची चालना मिळण्यास सहाय होणार आहे. पहिल्या तीन वर्षांतील अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतून कंपनीस बाहेर काढून तिला सुयशाचें मार्गावर आणण्याचें सर्व श्रेय तिचे मॅनेजर–डॉयरेक्टर श्री. व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी., ह्यांच्या योजनाचातुर्यास व कर्तबगारीस आहे.

---

### अनिल साप्ताहिक (सामान्य माणसाचें मुखपत्र)

श्री. अमरेंद्र गाडगीळ ह्यांच्या संपादकत्वाखालीं वरील साप्ताहिक जून, १९४७ पासून सुरू झालें आहे. " सामान्य माणसाचें मुखपत्र " ह्या वर्णनावरूनच साप्ताहिकाचें स्वरूप लक्षांत येईल. त्यांतील लेखांची विविधता आणि त्यांचें व्यावहारिक स्वरूप हीं चटकन लक्षांत आल्याविना रहात नाहींत. कोणतेंच सदर मर्यादेबाहेर लांबत नाहीं, हें प्रस्तुत साप्ताहिकाचें वैशिष्ट्य आहे. मुखपृष्ठहि उद्बोधक असतें. अशा तऱ्हेच्या ह्या उपयुक्त व मनोरंजक साप्ताहिकाचा उत्कर्ष होवो, असें आम्हीं इच्छितों. श्री. अमरेंद्र गाडगीळ ह्यांच्या ध्येयनिष्ठेस वाचकवर्गाचा पाठिंबा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

---

**यंत्रांमुळें कामगारांची व वेळेची बचत**—अमेरिकेंत शेतीसाठी यंत्रांचा वाढत्या प्रमाणावर उपयोग करण्यांत येत आहे. त्यामुळें, १९२० च्या मानानें आतां दोन तृतीयांश कामगार तेवढेंच उत्पादन करूं शकतात. वेळहि १०% कमी पुरतो.

## सावकारी नियंत्रण कायदा व व्यापारी

लेः– श्री. स. वा. दातार, बी. एससी., एलएल. बी.

सावकारी नियंत्रण कायद्यांत व्यापारी वर्गाच्या दृष्टीनें विशेष व्यवस्था करण्यांत आली आहे. व्यापारी वर्गाला दिलेल्या कर्जाचे बाबतींत हा कायदा पूर्णतया लागूं नाहीं. त्यामुळें कोणाहि व्यापाऱ्यास कर्जाऊ रकम द्यावयाची झाल्यास धनकोनें सावकारी नियंत्रण कायद्याखालील परवाना घेण्याची आवश्यकता नाहीं. परंतु धनकोस कोणाहि व्यापाऱ्याकडून कर्जाची रकम वसूल करून घेण्याचा हुकूमनामा देतांना मूळ कर्जाच्या रकमे इतकेंच जास्तींत जास्त व्याज कोर्टानें देऊं करावे, अधिक देऊं करूं नये, हा दाम दुपटीचा नियम लागूं करण्यांत आलेला असून सावकारी नियंत्रणाखालीं व्याजाचे जे कमाल दर सरकार वेळोवेळीं ठरवून देईल ते दरहि व्यापाऱ्यांना दिलेल्या कर्जावर बंधनकारक होणार आहेत. सावकारी नियंत्रण कायद्यानें तारणावरील कर्जांना जास्तींत जास्त सहा टक्केपर्यंत व बिनतारणावरील कर्जांना जास्तींत जास्त नऊ टक्केपर्यंत व्याजाचे दर ठरविण्याचे अधिकार सरकारला दिलेले आहेत. मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या भूविभागांची आर्थिक परिस्थिती लक्षांत घेऊन वरील कमाल मर्यादेच्या आंतील कोणतेहि व्याजाचे दर त्या त्या भूविभागासाठीं सरकार वेळोवेळीं ठरवून देणार असून तेच दर व्यापाऱ्यांना दिलेल्या कर्जाचे बाबतींतहि सावकारांना स्वीकारावे लागतील. कोणत्याहि प्रकारच्या मालाची अथवा स्थावर-जंगम मिळकतीची खरेदीविक्री करण्याचा ज्याचा नित्याचा व्यवसाय आहे त्यास या कायद्याअन्वयें व्यापारी (ट्रेडर) अशी संज्ञा असून सदर संज्ञेंत (१) घाऊक व किरकोळ व्यापारी (२) कमिशन एजंट (३) दलाल (ब्रोकर) (४) मालनिर्माते (मॅन्युफॅक्चरर) (५) मक्तेदार अथवा ठेकेदार (कॉन्ट्रॅक्टर) आणि (६) कारखाना मालक या सर्वांचा समावेश केलेला आहे. (१) शेतीच्या उत्पन्नाची किंवा गुरांची खरेदीविक्री करणाऱ्या मनुष्याचा अथवा (२) कारागिराचा समावेश मात्र या संज्ञेंत होणार नाहीं असें स्पष्टीकरण दिलेलें असून कारागीर याची व्याख्या अशी दिली आहे कीं, कर्ज घेण्यापूर्वी लगतच्या बारा महिन्यांच्या काळांतील कोणत्याहि एका दिवशीं आपल्या हाताखालीं माल उत्पादनाचे कामीं दहापेक्षां अधिक कामगार ज्याला ठेवावे लागत नाहींत तो कारागीर समजावा. सारांश, कोणाहि व्यापाऱ्यास अथवा आपल्या कामावर रोजी दहापेक्षां अधिक कामगार लावणाऱ्या कोणाहि कारखानदारास कर्ज द्यावयाचें झाल्यास त्यासाठी सावकारी नियंत्रण कायद्याखालील परवाना घेण्याची जरूर नाहीं. परंतु त्याचेकडून धनकोस व्याज मात्र सरकार जाहीर करील त्याच दरानें घ्यावें लागेल.

---

**मध्य प्रांतांत अल्युमिनियमचा कारखाना**—मध्यप्रांत सरकारनें आपल्या प्रांतांत एक अल्युमिनियमचा कारखाना काढण्याचं ठरविलें आहे. प्रथम रोजीं १० टन उत्पादन करणारा कारखाना काढण्याचें ठरलें होतें. परंतु मध्यवर्ती सरकारनें नेमलेल्या तज्ज्ञांच्या कमिटीच्या सूचनांप्रमाणें हा कारखाना अधिक मोठ्या प्रमाणावर निघण्याचा संभव आहे.

**फिरती ध्वनिकेंद्रें**—ऑगस्ट १५ नंतर पाकिस्तानांतील आणि हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या घटनांचें वृत्त ब्रिटिश लोकांना मिळावें, म्हणून ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशननें तीन फिरती ध्वनिकेंद्रें अनुक्रमें कराची, कलकत्ता व नवी दिल्ली येथें उभारण्याचें ठरविलें आहे.

## विमेदारानें कंपनीच्या सूचनेप्रमाणें करार पुरा केल्यावर पॉलिसीचा क्लेम दिला पाहिजे.

एका विमेदाराच्या विम्याचा हप्ता भरण्याची सवलतीची मुदत ८–११–१९३९ रोजीं संपत होती. विमेदारानें विमा कंपनीस पत्र पाठवून, सवलतीची मुदत ८–१२–१९३९ पर्यंत वाढविण्याविषयीं विनंति केली. २१–११–१९३९ रोजीं कंपनीनें ह्या पत्राचें उत्तर पाठवून, ८–१२–१९३९ पूर्वीहि विमेदारानें दंडासकट हप्त्याची रकम पाठवावी, म्हणजे पॉलिसीचें संरक्षण चालू राहील असें त्यास कळविलें. विमेदारानें २८–११–१९३९ रोजीं मनि ऑर्डरीनें रकम पाठविली परंतु तो २९–११–१९३९ रोजीं एकाएकी मृत्यू पावला. कंपनीस ३०–११–१९३९ रोजीं मनिऑर्डरीची रकम मिळाली. विमाकंपनीनें पॉलिसीची रकम देण्याचें नाकारलें, तेव्हां हें प्रकरण कडलोर येथील सबजज्जाच्या कोर्टांत गेलें. त्यावरील दुसऱ्या अपिलाचा मद्रास हायकोर्टांत निवाडा लागण्यास १९४७ साल उजाडलें. हायकोर्टाचें म्हणणें खालील प्रमाणें पडलें:—

"रद्द झालेली विमा पॉलिसी पुनः सुरू कशी करावयाची, ह्याचा तपशील विमा कंपनीनेंच पत्रानें विमेदारास कळविला. विमेदारानें पोस्टानें रकम धाडली, ह्याचा अर्थ त्यानें विमाकंपनीची सूचना मान्य केली असा होतो. म्हणजे, कंपनीची सूचना विमेदारानें मान्य करून ती अंमलांतहि आणली. पॉलिसी अर्थातच पुनः तरती झाली. विमेदार मरण पावेपर्यंत कंपनीस प्रत्यक्ष रकम मिळाली नाहीं, हें खरें असलें तरी जेव्हां विमेदारानें पोस्टानें रकम धाडली, तेव्हांच त्यानें नियोजित पद्धतीनें कराराची आपली बाजू पुरी केली होती. पोस्ट खात्याच्या नियमाप्रमाणें, मनिऑर्डरची रकम पत्त्यांतील इसमास देण्यांत येऊं नये, अशी पोस्टास सूचना देण्याचा रकम धाडणारास अधिकार आहे, परंतु त्यानें कोर्टापुढील प्रश्नास बाध येत नाहीं."

---

## दि इंटर नॅशनल बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेची विशेष साधारण सभा अहमदाबाद येथें नुकतीच झाली. ह्या बँकेस हिंदुस्थान सरकारनें नव्या ठेवी घेण्यास प्रतिबंध केला असून तिचें नांव शेड्यूल्ड बँकांच्या यादींतून काढलें असल्याचें वाचकांस माहीत आहेच. अर्थात्, रिझर्व्ह बँकेच्या शिफारशीस अनुसरूनच हें करण्यांत आलें. ठेवीदारांच्या हिताविरुद्ध इंटर नॅशनल बँकेनें ६२ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं होतीं, असें रिझर्व्ह बँकेस आढळून आलें होतें. त्यापैकीं ४६½ लाखांचीं कर्जें वसूल करण्यांत आलीं असल्याचें इं. बँकेच्या अध्यक्षांनीं सभेंत जाहीर केलें. इं. बँकेचे डायरेक्टर सरकारी हुकूम रद्द करून घेण्याच्या खटपटींत आहेत. बँकेचें १,०१,००,००० रुपयांचें भांडवल कमी करून तें ५१,२५,००० रु. करण्याचा ठराव सभेनें मंजूर केला. बँकेचें फिनॅन्स व इनव्हेस्टमेंट कॉर्पोरेशनमध्यें रूपांतर करण्यांत यावें, असें सभेंत सुचविण्यांत आलें त्या सूचनेचा डायरेक्टर बोर्ड विचार करील.

---

## दि पूना मर्चंटस को. बँक लि, पुणें

(वार्षिक सभाः १०–८–४७)

वरील बँकेचें वसूल भांडवल ९६,६२० रु. झालें आहे. ठेवींचा आकडा ७ लक्ष, ४० हजार रु. आहे. बँकेनें ५ लक्ष, ४६ हजार रु सरकारी रोख्यांत गुंतविले असून ४ लक्ष, ६० हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. वर्षअखेर ४,३२९ रु. निव्वळ नफा झाला. ३% डिव्हिडंडला २,९०० रु. लागतील व १,०९१ रु. रिझर्व्ह फंडांत जातील. चेअरमनः श्री. दा. वा. पोतदार; ऑनररी एजंट : ग. म. नलावडे; एजंट : म. ग. सावणे.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

सासाहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २२।७।४७ | बुधवार २३।७।४७ | गुरुवार २४।७।४७ | शुक्रवार २५।७।४७ | सोमवार २८।७।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६१७-८; २५२७-८ | १००—१३—० | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २९२० | २९५० | २९३५ | २९१७—८ | २९३६—४ |
| ६३८; ४५७—८ | १९—०—० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४१३ | ४१६—८ | ४१४ | ४१३—० | ४१४ |
| ६५; ३६—४ | ०—८—०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २८—१४ | २९—७ | २८—१२ | २९—१ | २९—७ |
| ७१-४; ४४—१० | ०—१४—०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३५—१० | ३६—४ | ३५—११ | ३६—१ | ३६—६ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३२७७-८; २११२—८ | ४०—०—०S | मार्च—सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ११६५ | ११८२—८ | ११६५ | ११६६—४ | ११५५ |
| ११८०; ६५८ | १३—०—०S | मार्च—सप्टें. | कोहिनूर | १०० | ६६४ | ६६७ | ६५९ | ६५५ | ६४८—० |
| ९९९; ६६० | २७—०—० | मे | स्वदेशी | १०० | ६५६ | ६६३ | ६५७ | ६६१ | ६५३—० |
| ५६७; ३९८ | २—०—०† | नोव्हें.—एप्रिल | नागपुर | १०० | ३३० | ३३९ | ३३५ | ३३५—८ | ३३९ |
| ५५२; ३१४ | १५—०—० | मार्च | फिनले | १०० | ३२० | ३१९ | ३१८ | ३१६—० | ३१६ |
| ५७१; ३२३ | १२—०—०S | ऑक्टो.—एप्रिल | गोकाक | १०० | ३४५ | ३४७ | ३४३ | ३४४—० | ३४५ |
| ५९४; ३२५—८ | ४—०—०† | जाने.—जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३५९ | ३६७ | ३६४ | ३६२—० | ३५९ |
| ७-४-६; ४-८-६ | ०—४—० | मार्च | अपोलो | २ | ४—७ | ४—८—६ | ४—८ | ४—८ | ४—८—६ |
| २९-१; १६-१२ | ०—१३—९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६—१२ | १६—१४ | १६—११ | १६—१३ | १६—१३—६ |
| ६-११-६; ३-३-६ | ०—२—६ | मे | ,, डिफर्ड | १ | ३—३ | ३—३—६ | ३—३ | ३—३ | ३—३—३ |
| १०९२—८; ७३५ | २१—०—० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६२५ | ६३३—१२ | ६३१—८ | ६३२—८ | ६३६—४ |
| २७८; २२५ | ७—०—० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७६—८ | १७६ | १७५—८ | १७४—८ | १७६ |
| ३७५; २४० | ९—०—० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २७८ | २७९ | २७७ | २७८ | २७६ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५१२—८ | ५२० | ५१७—८ | ५१३—१२ | ५१६—४ |
| ६०-१० ३६-१२ | १—४—० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३३ | ३३—४ | ३२—१३ | ३३—० | ३३—१२ |

**मुसलमान ठेवीदारांच्या ठेवींवरील व्याजाचा विनियोग**—पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवींवरील जें आपलें व्याज मुसलमान ठेवीदार घेऊन जात नाहींत, त्याचा विनियोग एका ट्रस्टमार्फत मुसलमानांच्या शिक्षणासाठी करण्याची योजना मागेंच जाहीर झाली आहे. ट्रस्टींच्या कमिटीचे डॉ. झिआउद्दीन अहमद हे अध्यक्ष व मि. अहमद ई. एच. जाफर हे सेक्रेटरी आहेत. ह्यापूर्वी मुसलमान ठेवीदारांचें जें व्याज बुडालें, त्याबद्दल २½ लक्ष रुपये देऊन ट्रस्टची स्थापना केली जात आहे. ह्यापुढील व्याज ट्रस्टला सालोसाल मिळत जाईल.

**कराची येथें म्यूझियम**—मोहन-जो-दारो येथील उत्खननांत सापडलेल्या मौल्यवान चिजा मांडून ठेवण्यासाठी कराची येथें एक म्यूझियम स्थापन करण्यांत येणार आहे.

**जमीनदारांना नुकसानभरपाई देऊं नका**—अखिल भारतीय किसान काँग्रेसचे अध्यक्ष, प्रो. रंगा ह्यांनीं जमीनदारी नष्ट करतांना जमीनदारांना नुकसानभरपाई देण्याला विरोध दर्शविला आहे. त्यांच्या मतानें, नुकसानभरपाई शेतकऱ्यांवर न लादतां ती सरकारनें द्यावी. बिहारचे मंत्री डॉ. सय्यद महमुद ह्यांनीं शेतकऱ्यांच्या सहकारी संघांनीं नुकसानभरपाई द्यावी असें सुचविलें आहे.

**सिलोनमधील बुद्धशिष्यांचे अवशेष**—सिलोनमधील बुद्धधर्मीयांच्या भावनांना मान देऊन बुद्धाच्या दोघा शिष्यांचे अवशेष ऑक्टोबर १९४८ पर्यंत सिलोनमध्येंच राहूं देण्यास हिंदुस्थान सरकारनें संमति दिली आहे.

**१५ वर्षांत ६००० शाळांच्या इमारती**—प्राथमिक शाळांसाठी ज्या ठिकाणीं योग्य जागा भाड्यानें मिळणार नाहीं, त्या ठिकाणीं १५ वर्षांत प्राथमिक शाळांच्या ६,००० इमारती बांधण्यासाठी मुंबई सरकारनें २० लाख रुपये बाजूला काढून ठेवले आहेत.

**परिचारिकांसाठी शिष्यवृत्त्या**—मागासलेल्या जातींतील ज्या स्त्रिया परिचारिका, आरोग्य तपासनीस, दाई होण्यास तयार असतील त्यांच्यासाठी मुंबई सरकारनें २५ रुपयांच्या १० शिष्यवृत्त्या देण्याचें ठरविलें आहे.

**ब्रिटिश सायकलींची निर्गत**—ग्रेट ब्रिटननें १९३७ सालीं जितक्या सायकली निर्गत केल्या, तितक्या कोणत्याच दुसऱ्या एका वर्षी निर्गत केलेल्या नाहींत. परंतु चालू वर्षी १९३७ च्या निर्गतीच्या दुप्पट निर्गत करण्याचा ब्रिटिश सायकल कारखानदारांचा विचार आहे. १९३८ सालीं ८ लक्ष सायकलींची निर्गत झाली होती. १९४६ सालीं १० लक्ष सायकलींची निर्गत झाली. १९४७ सालीं २४ लक्ष सायकलींची निर्गत होईल अशी अपेक्षा आहे.

**श्री. दामूअण्णा पोतदार ह्यांची मतदार बँकांस विनंति.**

श्री. दा. वा. पोतदार, बी. ई. (इले.), बी. ई. (मेकॅ) हे आज कित्येक वर्षें अर्बन बँकांतर्फें मुंबई प्रां. सहकारी बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर निवडून येत आहेत. येत्या निवडणुकीसाठीहि ते उभे राहिले आहेत आणि त्यांना नेहमीप्रमाणें पाठिंबाहि चांगला मिळाला आहे.

प्रां. बँकेच्या कामासाठी ते नुकतेच मुंबईस गेले असतां, ट्रॅममधून उतरतांना ते गर्दी करणाऱ्या उतारूंकडून बाहेर ढकलले गेले व त्यामुळें खालीं पडून त्यांच्या मांडीच्या हाडास दुखापत झाली. कांहीं आठवडे त्यांची मांडी प्लॅस्टरमध्यें ठेवावी लागेल व त्यामुळें ते उठूंहि शकणार नाहींत. अशा परिस्थितींत, त्यांना अधिकांत अधिक मतें मिळविण्यासाठी प्रयत्न करणें अशक्यप्राय आहे. श्री पोतदारांची ही अडचण व त्यांची आजवरची कामगिरी लक्षांत घेऊन त्यांची निवड अर्बन बँकांनीं करावी, अशी त्यांची विनंति आहे.

# हिंदी आणि इंग्रजी विमा कंपन्यांचा कारभार

लेखकः—श्री. वि. गो. जोशी, बी. ए.

(आमचे मित्र, " औंध म्युच्युअल " चे संस्थापक व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वि. गो. जोशी हे ग्रेट ब्रिटनमधील विमा व्यवसायाचें निरीक्षण करण्यासाठीं त्या देशास नुकतीच स्वखर्चानें भेट देऊन आले. त्यांच्या अनुभवावर आधारलेला हा लेख प्रसिद्ध करण्यास आम्हांस आनंद होत आहे. श्री. जोशी ह्यांनीं इंग्रजी विमा कंपन्यांच्या ज्या व्यवहारपद्धतींचें वर्णन केलें आहे, ती पद्धति त्यांनीं स्वतःच्या कंपनींत आर्धापासूनच अवलंबिलेली आहे.)



~ लेखक ~

नुकतीच हिंदी विमा कंपन्या आणि इंग्रजीविमा कंपन्या यांच्या कामाची आणि या कंपन्यांवर बंधनात्मक असणाऱ्या कायद्यांची तुलनात्मक पहाणी करण्याची संधि मला प्राप्त झाली होती, आणि सदर पहाणींत मला जें आढळून आलें त्याबाबतचें विवेचन प्रस्तुत लेखांत थोडक्यांत करण्याचा माझा बेत आहे.

### कंपन्यांची संस्थापन पद्धति

आपणाकडे सर्वसाधारणपणें विम्याचा व्यवहार तीन प्रकारच्या कंपन्याकडून केला जातो. (१) समाईक भांडवलाच्या कंपन्या (२) म्युच्युअल व सहकारी कंपन्या आणि (३) प्रॉव्हिडंट कंपन्या. याच्या उलट इंग्लंडमध्यें (१) समाईक भांडवलाच्या कंपन्या (२) म्युच्युअल कंपन्या (३) फ्रेंडली सोसायटीज् व (४) इन्डस्ट्रिअल इन्शुअरन्स कंपन्या, इतक्या प्रकारच्या विभागांत असतात. आपणाकडे वरील तीन व चार स्वरूपाच्या कंपन्या नाहींत, व त्यांच्याकडे प्रॉव्हिडंट कंपन्या नाहींत.

### काम करण्याची पद्धत

इंग्रजी विमा कंपन्या सर्वसाधारणपणें आपला व्यवहार उत्पन्नाचें ठराविक प्रमाणांत खर्च ठेऊन करतात. सर्वसाधारणपणें आयुर्विमा कंपनी एजंटांस प्रथम वर्षाचे हप्त्यामधून विम्याच्या रकमेच्या १॥ ते २॥ टक्यापर्यंत आणि रिन्युअलवर हप्त्याच्या २॥ टक्यापर्यंत कमिशन देते. म्हणजे आमच्या हिंदी कंपन्या जेवढें कमिशन देतात त्याच्या सुमारें निम्में कमिशन एजंटास देण्यांत येतें. एजंटाचे वरती बाह्य क्षेत्रांत " इन्शुअरन्स ब्रोकर्स " नांवाचे, एजंट आणि कंपनी यामधील मध्यस्थी असतात. ब्रोकर साधारणपणें कोणत्याही कंपनीस काम देतो आणि त्यावर अमुक एक काम केलेंच पाहिजे असें बंधन नाहीं. परंतु त्यांचेकडे स्पेशल एजंट व चीफ एजंट हे वर्ग नाहींत. तसेंच अशा तऱ्हेच्या मध्यस्थांना अवास्तव मेहनताना दिला जात नाहीं, यामुळें इंग्लंडमधील कित्येक कंपन्या प्रथम वर्षाचे अखेरदेखील आपल्या पॉलिसींना सोड किंमत (सरेंडर व्हॅल्यू) देऊं शकतात. कारण, कंपन्यांच्या प्रथम वर्षांतील खर्च भागवून प्रथम हप्त्यांतील बराचसा भाग जवळ शिल्लक रहातो.

इंग्लंडमधील बऱ्याचशा कंपन्यांच्या कार्याचा विस्तार इंग्लंडबाहेर असतो. काम करण्याची पद्धत साधारणपणें शाखा कचेऱ्या उघडूनच असते. चीफ एजन्सीची पद्धत क्वचितच आढळून येते.

### खर्चाचें प्रमाण

वर निर्देशिल्याप्रमाणें हप्त्याच्या उत्पन्नापैकीं एजंटांस व इतर मध्यस्थांस प्रथम वर्षाचे हप्त्यावर (त्यांत शाखांचा खर्च धरून) अधिकांत अधिक ५५ ते ६० टक्के व रिन्यूअलवर सुमारें ४ टक्के खर्च होतो व एकूण खर्चाचें प्रमाण सर्वसाधारणपणें प्रथम हप्त्यांतील साधारण ६५ टक्के भाग आणि रिन्यूअलवरील ६ टक्के एवढ्यांत असते. यामुळें रिन्यूअल खर्चाचें प्रमाण १० टक्यापेक्षा अधिक बसत नाहीं.

या उलट, हिंदी विमा कंपन्या प्रथम वर्षाचे हप्त्यावर चीफ एजंटास ७०–७५ टक्याहून अधिक कमिशन देत असतात व रिन्यूअलचे हप्त्यावर चीफ एजंटाला ७½ टक्के कमिशन मिळतें. याखेरीज मुख्य कचेरीचा खर्च आणि त्यावर सरकारी निदानाप्रमाणें खर्चाचें प्रमाण काढल्यास आपल्या हिंदी कंपन्यांच्या सुमारें ७० टक्के कंपन्या रिन्यूअलवर २० टक्याच्या आंत–बाहेर खर्च करीत असतात आणि कित्येक कंपन्यांचें हें प्रमाण ६० ते ७० टक्यापर्यंत असतें. हा अवास्तव खर्च वाढण्यास तीन मोठीं दोषास्पद कारणें आहेत:– (१) थोडें काम करून अधिक कमिशन मिळविणारे मध्यस्थी, स्पेशल व चीफ एजंट, (२) नवीन कामाचे फुगवून आंकडे दाखविण्याची हाव आणि (३) या अनुषंगानें होणारा जाहिरात व प्रचार खर्च. आमच्यांतील या दोषामुळें काटकसर करून विम्याचे स्वरूपांत शिल्लक टाकणाऱ्या बिचाऱ्या विमेदाराचें नुकसान होतें. खरें पाहूं गेलें असतां कोणत्याहि चीफ एजंटास अधिकांत अधिक प्रथम वर्षाचे हप्त्यावर ६० टक्के व रिन्यूअलवर ६ टक्के यापेक्षां अधिक कमिशन देणें धोक्याचें ठरेल.

### व्याजाचा दर

इंग्लंडमध्यें प्राप्तीवरील कराचें प्रमाण जरी मोठें असलें तरी विमा कंपन्यांना अधिकांत अधिक कराची मर्यादा आहे. सर्वसाधारणपणें पैसे गुंतविण्याची पद्धत सुरक्षिततेवर नजर ठेऊनच असते आणि त्यामुळें गुंतविलेल्या रकमेवर साधारणपणें ३ पासून ४ टक्यांपर्यंत व्याज सुटतें. सध्यां आपल्याकडेही यापेक्षां अधिक व्याजाचा दर सुटत नाहीं.

### हप्त्यांचे दर

सर्वसाधारणपणें इंग्रजी विमा कंपनीचे हप्त्याचे दर सध्या २॥ टक्के व्याजाच्या हिशोबावर असतात. याउलट आपल्याकडे अद्याप ते ३॥–४ टक्याच्या व्याजाच्या हिशोबावर आधारलेले हप्त्याचे दर प्रचलित आहेत आणि आतां विमापन ३ टक्यापेक्षां अधिक व्याजाच्या हिशोबांत होत नसल्यानें त्यांत तूट येण्याचा संभव असतो.

### सरकारी बंधनें

इंग्लंडमध्यें एजंटास लायसेन्स पद्धत नाहीं, कमाल कमिशनच्या मर्यादा नाहींत, किंवा कंपन्यावर मालमत्ता गुंतविणेसंबंधीं

निर्बंध नाहींत. कंपन्यांना डिपॉझिटची अट नाहीं आणि वार्षिक अहवालाखेरीज इतर माहितीचे तक्ते भरण्याची पद्धत नाहीं. सर्वसाधारणपणें कंपन्यांना आपला व्यवहार स्वतःच्या बुद्धिमत्तेप्रमाणें व ताकतीप्रमाणें करण्याची मुभा असते. अर्थात् साल अखेर ताळेबंद सादर करणेची व योग्य वेळीं विमापन करण्याचीं बंधनें असतात. बोर्ड ऑफ ट्रेड कडून कंपनीकडून आलेलें विमापन वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मर्जीबरहुकूम दुरुस्त करून देण्यासंबंधीं वगैरे दुराग्रह धरला जात नाहीं, अगर सरकारी ॲक्चुअरीला अशा तऱ्हेचे अधिकारही नसतात.

आपल्याकडे सध्यां जो विमा कायदा झाला आहे, त्याची घटना धंद्याची माहिती नसलेल्या किंवा फाजील सुरक्षिततेकडे लक्ष देणाऱ्या व्यक्तीकडून केली गेली आहे. त्यामुळें सुपरिंटेन्डन्ट ऑफ इन्शुअरन्सला अवास्तव अधिकार देऊन त्याचा उपयोग विमा कंपन्यांना अरेरावीनें वागवण्यांत केला जातो. विमेदारांच्या हिताकडे क्वचितच लक्ष पुरविलें जातें. त्यामुळें उत्कृष्ट विमा-गणितींनीं केलेलीं विमापनें नाकारण्यांत येतात आणि त्याविरुद्ध इलाज अशक्य होतो.

उद्यांच्या स्वतंत्र भारताच्या जीवनांत राष्ट्रीय सरकारला जर विमेदारांचें खरेंच हित साधावयाचें असेल, तर सरकारी ऑफिसांतील अरेरावी पहिल्यानें नष्ट झाली पाहिजे, आणि असले कुचकामाचे कायदे सुधारून त्यांत सुसंगता आणली पाहिजे. सरकारी नोकर हे समाजाचे नोकर असून, मालक नाहींत ही जाणीव त्यांना असण्यास हवी आणि जनतेस अगर व्यापारी संस्थांस मार्गदर्शन करण्याचें आपलें काम आहे; जुलूम करण्याचें नाहीं, ही तत्त्वें त्यांच्या मनावर व आचरणावर बिंबविलीं पाहिजेत, म्हणजेच सर्व गाडें सुरळीत होईल.

### विमेदारांचे विश्वस्त

याउलट, विमा कंपन्यांनीं आपण विमेदारांचे विश्वस्त असून, त्यांच्या वित्ताचा विनियोग व्यवस्थितपणें करणें आणि खर्चाचें प्रमाण पद्धतशीर मर्यादेंत राखणें याकडे लक्ष ठेवण्यास हवें. कोणताही देश असो, आणि कोणत्याही तऱ्हेचें सरकार असो, राष्ट्राचें संरक्षण, उद्योगधंद्याची उन्नति, संपत्तीचें उत्पादन आणि न्याय्य विभागणी तसेंच समाजांत सौजन्य आणि एकमेकांस मदत करण्याची वृत्ति, व्यक्तींची मालमत्ता आणि हक्क यांचें संरक्षण, इकडेच सरकारचें अधिक लक्ष हवें; ज्याच्या हातांत सत्ता तो सुलतान, अशी परिस्थिति झाली तर आजपर्यंत इतक्या सुलतानशाही नष्ट झाल्या त्यांच्यांतच आणखी एक नवा बळी पडेल.

सुसंघटित, सुशिक्षित आणि अर्वाचीन समाजांत प्रत्येक व्यक्तीस समाजाकडून जसे हक्क असतात, तसेंच समाजासाठीं कर्तव्यही असतें. कर्तव्याखेरीज हक्क नाहीं, हक्काखेरीज कर्तव्य होणार नाहीं.

आमच्या हिंदी कंपन्यांना जर सरकारकडून हक्क व सवलती हव्या असतील तर त्यांनीं आपले विमेदारांचे बाबतींतील कर्तव्य चोख तऱ्हेनें आणि योग्य खर्चाचे प्रमाणांत पार पाडण्यास हवें. विम्याचा धंदा म्हणजे आंकडेबाजीची सोडत नव्हे अगर पोकळ आंकडे फुगवून व्यावहारिक सट्टेबाजी नव्हे. विमाव्यवहार हें एक पद्धतशीर शास्त्र आहे व विम्याचा व्यवहार शास्त्रीय चाकोरींतूनच चालण्यास हवा व तेथें व्यक्तिगत आकांक्षेप्रमाणें जनतेच्या कष्टानें संपादलेल्या विम्यावर चालणारी प्रयोगशाळा चालविणें अयोग्य ठरेल. म्हणून आमच्या विमाकंपन्यांच्या चालकांनीं पोकळ आकांक्षेस बळी पडून व चढाओढीच्या मागें लागून विमेदारांचें हितसाधन व संरक्षण हेंच ध्येय बाळगण्यास हवें व हें ध्येय गांठण्यास मार्गदर्शन करणें व अशा चालकांना चुकीच्या मार्गापासून परावृत्त करणें, इतकेंच सरकारी ऑफिसचें काम राहतें.




सारस्वत

को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३१-५-१९४७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९७,३४० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. २,०४,००० |
| ठेवी | ... | रु. ६९,७३,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७६,७५,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम

व्याज : २ टक्के


बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )





अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

### टाटाचें डिव्हिडंड कमी झालें

३१ मार्च, १९४७ अखेर संपलेल्या वर्षाकरितां टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. खालीलप्रमाणें डिव्हिडंड देणार आहेः—

ऑर्डिनरी, प्रत्येक भागास १९ रु. ( करमाफ )

डिफर्ड, प्रत्येक भागास १०० रु. १३ आ. ४ पै. ( करमाफ )

त्यापूर्वीचीं चार वर्षे डिव्हिडंडचा दर २३ रु. व १२९ रु. ८ आ. ९ पै. कायम होता. सर्वांत ज्यास्त डिव्हिडंड ( २९ रु. व १७२ रु. १० आ. ) १९४०–४१ मध्यें देण्यांत आलें. गेल्या कांहीं वर्षांतील डिव्हिडंडचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहेः—

| | डिव्हिडंडचा दर ( प्रत्येक भागास ) | |
|---|---|---|
| | ऑर्डिनरी | डिफर्ड |
| १९३४–३५ | नाहीं | नाहीं |
| १९३५–३६ | ६–०–० | ७–८–० |
| १९३६–३७ | १०–०–० | ३६–३–६ |
| १९३७–३८ | १५–८–० | ७५–११–३ |
| १९३८–३९ | १८–०–० | ९३–१०–५ |
| १९३९–४० | २५–०–० | १४३–१४–७ |
| १९४०–४१ | २९–०–० | १७२–१०–० |
| १९४१–४२ | २७–०–० | १५८–४–४ |
| १९४२–४३ | २३–०–० | १२९–८–९ |
| १९४३–४४ | २३–०–० | १२९–८–९ |
| १९४४–४५ | २३–०–० | १२९–८–९ |
| १९४५–४६ | २३–०–० | १२९–८–९ |
| १९४६–४७ (सुचविलेलें) | १९–०–० | १००–१३–४ |

### न्यूजप्रिंटची गिरणी स्थापन होणार

न्यूजप्रिंट कागदाच्या उत्पादनासाठी बऱ्हाणपूर (मध्यप्रांत) येथें एक गिरणी स्थापन होत आहे. त्यासाठी नॅशनल न्यूजप्रिंट अँड पेपर मिल्स लि. ला मध्यप्रांत सरकारनें जमीन, पाणी, रस्ते, वीज, इत्यादींबाबत सवलती दिल्या आहेत. कंपनीचें अधिकृत भांडवल ५ कोटि रुपये राहील व त्यांपैकीं १½ कोटींचें भांडवल विक्रीस काढलें जाईल. मध्यप्रांत सरकार स्वतः कांहीं शेअर्स घेणार आहे, आणि तिचे दोघे अधिकारी कंपनीच्या बोर्डावर राहातील. कागदाच्या रांध्यास लागणारें लाकूड मुबलक प्रमाणांत उपलब्ध आहे. दि नायर सिंडिकेट लि. मुंबई, कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. गिरणीमध्यें प्रारंभीं दररोज १०० टन कागदाचें उत्पादन होऊं शकेल.

### चहाच्या बाजारपेठेची चलती

दुसऱ्या महायुद्धामुळें ज्या देशांतून पूर्वी चहा घेण्याची प्रथा नव्हती, अशा कांहीं देशांतून ती आतां पडली आहे. ज्या देशांतून चहा घेण्याची पद्धत होती, तेथें ती अधिकच वाढली आहे. जगांतील चहाचें अधिकांत अधिक उत्पादन ९० कोटी पौंड होऊं शकेल. ह्या संभाव्य उत्पादनापैकी १९३९ सालचा इंग्लंडमधील खप हिशेबांत धरला तरीसुद्धां, एकट्या इंग्लंडलाच ४७ कोटी, ५० लाख पौंड इतका चहा लागेल. आयर्लंड, कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिआ, मध्यपूर्वेकडील देश, इत्यादि देशांतून चहा पिण्याचें माणशीं प्रमाण वाढलें आहे. चीन, जपान, जावा इत्यादि देशांतील चहाचें उत्पादन अद्याप युद्धपूर्वकालाइतकें होत नाहीं. वरील माहितीवरून चहाच्या खपाच्या बाजारपेठेला भविष्यकाळ चांगला आहे, हें दिसून येईल.


## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

## गोवर्धन डेअरी फार्म्स लि.

गोवर्धनवाडी, पुणें १

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ सरदार के. आर. विंचूरकर, बी. ए., एलएल. बी., जहागिरदार, पुणें ( चेअरमन )
२ सरदार व्ही. डी. पानसे, जहागिरदार, पुणें.
३ श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए., मुंबई.
४ श्री. एस. एस. निसळ, जहागिरदार व बँकर, अहमदनगर.
५ श्री. एल. जी. लोंढार, मर्चंट, पुणें.
६ सरदार अमरसिंहराव कदम, पुणें.
७ रावसाहेब वाय. डी. खोले, पुणें. ( स्पेशल डायरेक्टर )
८ श्री. व्ही. एस. सोलापूरकर, लँडलॉर्ड, पुणें. ( अधिकारपरत्वें )

—मॅनेजिंग एजंटस—

★ मेसर्स सोलापूरकर अँड डोणवाड ★

### कंपनीचीं वैशिष्ट्यें

★ कंपनीनें आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री, ट्रॅक्टर वगैरे आणविली असून तिच्या सहाय्यानें शेतीचीं सर्व कामें करून घेणार आहेत.

★ कंपनीनें बाजारभाव सुमारें १ लक्ष रु. असलेली जमीन माफक किंमतीस मिळविली आहे.

★ कंपनीच्या डेअरीमध्यें फक्त गाई — सिंधी गाईच — आहेत.

★ पहिल्याच वर्षी कंपनीनें ६% व ३% डिव्हिडंड दिलें आहे.

—अधिक माहितीसाठी चौकशी करावी—

मॅनेजिंग एजंटस

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
☞ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ☜
९६ नारायण पेठ, पुणें २.

निर्बंध नाहींत. कंपन्यांना डिपॉझिटची अट नाहीं आणि वार्षिक अहवालाखेरीज इतर माहितीचे तक्ते भरण्याची पद्धत नाहीं. सर्व-साधारणपणें कंपन्यांना आपला व्यवहार स्वतःच्या बुद्धिमत्तेप्रमाणें व ताकतीप्रमाणें करण्याची मुभा असते. अर्थात् साल अखेर ताळेबंद सादर करणेची व योग्य वेळीं विमापन करण्याचीं बंधनें असतात. बोर्ड ऑफ ट्रेड कडून कंपनीकडून आलेलें विमापन वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मर्जीबरहुकूम दुरुस्त करून देण्यासंबंधीं वगैरे दुराग्रह धरला जात नाहीं, अगर सरकारी ॲक्चुअरीला अशा तऱ्हेचे अधिकारही नसतात.

आपल्याकडे सध्यां जो विमा कायदा झाला आहे, त्याची घटना धंद्याची माहिती नसलेल्या किंवा फाजील सुरक्षिततेकडे लक्ष देणाऱ्या व्यक्तीकडून केली गेली आहे. त्यामुळें सुपरिंटेन्डन्ट ऑफ इन्शुअरन्सला अवास्तव अधिकार देऊन त्याचा उपयोग विमा कंपन्यांना अरेरावीनें वागवण्यांत केला जातो. विमेदारांच्या हिताकडे क्वचितच लक्ष पुरविलें जातें. त्यामुळें उत्कृष्ट विमा-गणितींनीं केलेलीं विमापनें नाकारण्यांत येतात आणि त्याविरुद्ध इलाज अशक्य होतो.


उद्यांच्या स्वतंत्र भारताच्या जीवनांत राष्ट्रीय सरकारला जर विमेदारांचें खरेंच हित साधावयाचें असेल, तर सरकारी ऑफिसांतील अरेरावी पहिल्यानें नष्ट झाली पाहिजे, आणि असले कुचकामाचे कायदे सुधारून त्यांत सुसंगता आणली पाहिजे. सरकारी नोकर हे समाजाचे नोकर असून, मालक नाहींत ही जाणीव त्यांना असण्यास हवी आणि जनतेस अगर व्यापारी संस्थांस मार्गदर्शन करण्याचें आपलें काम आहे; जुलूम करण्याचें नाहीं, ही तत्त्वें त्यांच्या मनावर व आचरणावर बिंबविलीं पाहिजेत, म्हणजेच सर्व गाडें सुरळीत होईल.

### विमेदारांचे विश्वस्त

याउलट, विमा कंपन्यांनीं आपण विमेदारांचे विश्वस्त असून, त्यांच्या वित्ताचा विनियोग व्यवस्थितपणें करणें आणि खर्चाचें प्रमाण पद्धतशीर मर्यादेंत राखणें याकडे लक्ष ठेवण्यास हवें. कोणताही देश असो, आणि कोणत्याही तऱ्हेचें सरकार असो, राष्ट्राचें संरक्षण, उद्योगधंद्याची उन्नति, संपत्तीचें उत्पादन आणि न्याय्य विभागणी तसेंच समाजांत सौजन्य आणि एकमेकांस मदत करण्याची वृत्ति, व्यक्तींची मालमत्ता आणि हक्क यांचें संरक्षण, इकडेच सरकारचें अधिक लक्ष हवें; ज्याच्या हातांत सत्ता तो सुलतान, अशी परिस्थिति झाली तर आजपर्यंत इतक्या सुलतानशाही नष्ट झाल्या त्यांच्यांतच आणखी एक नवा बळी पडेल.

सुसंघटित, सुशिक्षित आणि अर्वाचीन समाजांत प्रत्येक व्यक्तीस समाजाकडून जसे हक्क असतात, तसेंच समाजासाठीं कर्तव्यही असतें. कर्तव्याखेरीज हक्क नाहीं, हक्काखेरीज कर्तव्य होणार नाहीं.


आमच्या हिंदी कंपन्यांना जर सरकारकडून हक्क व सवलती हव्या असतील तर त्यांनीं आपले विमेदारांचे बाबतींतील कर्तव्य चोख तऱ्हेनें आणि योग्य खर्चाचे प्रमाणांत पार पाडण्यास हवें. विम्याचा धंदा म्हणजे आंकडेबाजीची सोडत नव्हे अगर पोकळ आंकडे फुगवून व्यावहारिक सट्टेबाजी नव्हे. विमाव्यवहार हें एक पद्धतशीर शास्त्र आहे व विम्याचा व्यवहार शास्त्रीय चाकोरींतूनच चालण्यास हवा व तेथें व्यक्तिगत आकांक्षेप्रमाणें जनतेच्या कष्टानें संपादलेल्या विम्यावर चालणारी प्रयोगशाळा चालविणें अयोग्य ठरेल. म्हणून आमच्या विमाकंपन्यांच्या चालकांनीं पोकळ आकांक्षेस बळी पडून व चढाओढीच्या मार्गे लागून विमेदारांचें हितसाधन व संरक्षण हेंच ध्येय बाळगण्यास हवें व हें ध्येय गांठण्यास मार्गदर्शन करणें व अशा चालकांना चुकीच्या मार्गापासून परावृत्त करणें, इतकेंच सरकारी ऑफिसचें काम राहतें.

सारस्वत
को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३१–५–१९४७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९७,३४० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. २,०४,००० |
| ठेवी | ... | रु. ६९,७३,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७६,७५,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम
व्याज : २ टक्के
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा
व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी
सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

### टाटाचें डिव्हिडंड कमी झालें

३१ मार्च, १९४७ अखेर संपलेल्या वर्षाकरितां टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. खालीलप्रमाणें डिव्हिडंड देणार आहेः—

ऑर्डिनरी, प्रत्येक भागास १९ रु. ( करमाफ )

डिफर्ड, प्रत्येक भागास १०० रु. १३ आ. ४ पै. ( करमाफ )

त्यापूर्वींचीं चार वर्षें डिव्हिडंडचा दर २३ रु. व १२९ रु. ८ आ. ९ पै. कायम होता. सर्वांत ज्यास्त डिव्हिडंड ( २९ रु. व १७२ रु. १० आ. ) १९४०–४१ मध्यें देण्यांत आलें. गेल्या कांहीं वर्षांतील डिव्हिडंडचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहेः—

| वर्ष | डिव्हिडंडचा दर ( प्रत्येक भागास ) ऑर्डिनरी | डिफर्ड |
|---|---|---|
| १९३४–३५ | नाहीं | नाहीं |
| १९३५–३६ | ६–०–० | ७–८–० |
| १९३६–३७ | १०–०–० | ३६–३–६ |
| १९३७–३८ | १५–८–० | ७५–११–३ |
| १९३८–३९ | १८–०–० | ९३–१०–५ |
| १९३९–४० | २५–०–० | १४३–१४–७ |
| १९४०–४१ | २९–०–० | १७२–१०–० |
| १९४१–४२ | २७–०–० | १५८–४–४ |
| १९४२–४३ | २३–०–० | १२९–८–९ |
| १९४३–४४ | २३–०–० | १२९–८–९ |
| १९४४–४५ | २३–०–० | १२९–८–९ |
| १९४५–४६ | २३–०–० | १२९–८–९ |
| १९४६–४७ | १९–०–० | १००–१३–४ |

(सुचविलेलें)

### न्यूजप्रिंटची गिरणी स्थापन होणार

न्यूजप्रिंट कागदाच्या उत्पादनासाठी बऱ्हाणपूर (मध्यप्रांत) येथें एक गिरणी स्थापन होत आहे. त्यासाठी नॅशनल न्यूजप्रिंट अँड पेपर मिल्स लि. ला मध्यप्रांत सरकारनें जमीन, पाणी, रस्ते, वीज, इत्यादींबाबत सवलती दिल्या आहेत. कंपनीचें अधिकृत भांडवल ५ कोटि रुपये राहील व त्यांपैकीं १½ कोटींचें भांडवल विक्रीस काढलें जाईल. मध्यप्रांत सरकार स्वतः कांहीं शेअर्स घेणार आहे, आणि तिचे दोघे अधिकारी कंपनीच्या बोर्डावर राहातील. कागदाच्या रोंध्यास लागणारें लाकूड मुबलक प्रमाणांत उपलब्ध आहे. दि नायर सिंडिकेट लि. मुंबई, कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. गिरणीमध्यें प्रारंभीं दररोज १०० टन कागदाचें उत्पादन होऊं शकेल.

### चहाच्या बाजारपेठेची चलती

दुसऱ्या महायुद्धामुळें ज्या देशांतून पूर्वी चहा घेण्याची प्रथा नव्हती, अशा कांहीं देशांतून ती आतां पडली आहे. ज्या देशांतून चहा घेण्याची पद्धत होती, तेथें ती अधिकच वाढली आहे. जगांतील चहाचें अधिकांत अधिक उत्पादन ९० कोटी पौंड होऊं शकेल. ह्या संभाव्य उत्पादनापैकी १९३९ सालचा इंग्लंडमधील खप हिशेबांत धरला तरीसुद्धां, एकट्या इंग्लंडलाच ४७ कोटी, ५० लाख पौंड इतका चहा लागेल. आयर्लंड, कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिआ, मध्यपूर्वेकडील देश, इत्यादि देशांतून चहा पिण्याचें माणशीं प्रमाण वाढलें आहे. चीन, जपान, जावा इत्यादि देशांतील चहाचें उत्पादन अद्याप युद्धपूर्वकालाइतकें होत नाहीं. वरील माहितीवरून चहाच्या खपाच्या बाजारपेठेला भविष्यकाळ चांगला आहे, हें दिसून येईल.


## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

## गोवर्धन डेअरी फार्म्स लि.

गोवर्धनवाडी, पुणें १

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ सरदार के. आर. चिंचूरकर, बी. ए., एलएल. बी., जहागिरदार, पुणें ( चेअरमन )
२ सरदार व्ही. डी. पानसे, जहागिरदार, पुणें.
३ श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए., मुंबई.
४ श्री. एस. एस. निसळ, जहागिरदार व बँकर, अहमदनगर.
५ श्री. एस. जी. लोंवार, मर्चंट, पुणें.
६ सरदार अमरसिंहराव कदम, पुणें.
७ रावसाहेब वाय. डी. खोले, पुणें. ( स्पेशल डायरेक्टर )
८ श्री. व्ही. एस. सोलापूरकर, लँडलॉर्ड, पुणें. ( अधिकारपरत्वें )

—मॅनेजिंग एजंटस—

★ मेसर्स सोलापूरकर अँड डोणवाड ★

### कंपनीचीं वैशिष्ट्यें

★ कंपनीनें आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री, ट्रॅक्टर वगैरे आणविलीं असून तिच्या सहाय्यानें शेतीचीं सर्व कामें करून घेणार आहेत.

★ कंपनीनें बाजारभाव सुमारें १ लक्ष रु. असलेली जमीन माफक किंमतीस मिळविली आहे.

★ कंपनीच्या डेअरीमध्यें फक्त गाई — सिंधी गाईच — आहेत.

★ पहिल्याच वर्षीं कंपनीनें ६% व ३% डिव्हिडंड दिलें आहे.

—अधिक माहितीसाठी चौकशी करावी—

मॅनेजिंग एजंटस

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी
९६ नारायण पेठ, पुणें २.

**जळगांव तालुका डेव्हलपमेंट ॲग्रि. को. असोसिएशन लि., जळगांव**

वरील असोसिएशनचा ३१ मार्च, १९४६ अखेरचा अहवाल आमचेकडे आला आहे. असोसिएशनचा 'अ' हा ऑडिट वर्ग १८ वर्षे कायम आहे. १९४४–४५ मध्यें सभासद संख्या ६,२०९ होती ती अहवालाचे वर्षी ४,७९७ झाली. असोसिएशननें ३,०४,१०० रुपयांच्या बीं, बियाणें, खतें, कलमें, औतें वगैरे जिनसा शेतकऱ्यांना पुरविल्या. गुरांची जोपासना, नांगर, पिकांचे प्लॅनिंग, बंडिंग, सायलो, कॅटलडीप, जमाबंदी, इत्यादींचीं प्रात्यक्षिकें व प्रदर्शनें भरविण्यांत आलीं. वृक्षारोपण दिन साजरा करण्यांत आला. जमिनीचा सुपीकपणा टिकविण्याचे प्रयत्न केले गेले. मॉडेल पोल्ट्री फार्मचें यश सुप्रसिद्धच आहे. गिलगन कॅटल ब्रीडिंग फार्म, पिंपळे, ह्या फार्मची उत्कृष्ट प्रगति झाली आहे. त्यानें आजवर २५० जनावरें खानदेश जिल्ह्यांत पुरविलीं आहेत. अशा तऱ्हेनें असोसिएशननें आपलें उपयुक्त कार्य जोमानें चालू ठेवलें आहे. रावसाहेब टी. बी. भोयटे हे सोसायटीचे प्रेसिडेंट आहेत.

---

**कोर्टी येथें विविध कार्यकारी सोसायटीची स्थापना**

कोर्टी (ता. पंढरपूर) येथें ता. १४–७–४७ रोजीं श्री. रंगनाथ कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखालीं श्री महादेव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची पहिली जनरल सभा भरली होती. सदर प्रसंगीं पंढरपूर विभागाचे सें. बँकेचे इन्स्पेक्टर श्री. साळुंके ह्यांनीं सहकारी सोसायटीपासून शेतकऱ्यांना होणारे फायदे, सहकारी सोसायट्यांचे उद्देश, पोटनियम व कामकाजाबद्दल माहिती सांगून गांवकऱ्यांस त्यांच्या गांवीं स्थापन होत असलेल्या सोसायटया कशा तऱ्हेनें चालवाव्या म्हणजे त्यांपासून गांवकऱ्यांसही सोसायटीचा फायदा घेतां येईल व सोसायटीही उर्जितावस्थेस येईल हें समजावून सांगितले. चेअरमनचे जागी श्री. सर्वोत्तम गोपाळ कुलकर्णी यांची निवड झाली.

---

**ग्राहकांच्या सहकारी चळवळींत सुरत शहराची आघाडी**

युद्धकालांत जीवनोपयोगी वस्तूंचा तीव्र तुटवडा भासूं लागल्यामुळें साहजिकच ग्राहकांची सहकारी चळवळ संघटित होऊं लागली; आणि आपल्या प्रांतांत सुरत शहरांत या चळवळीनें विशेष जोम धरला आहे. सध्यां या शहरांत ग्राहकांच्या ४५ सहकारी संस्था काम करीत असून त्यांच्या सभासदांची एकूण संख्या १०,०५८ आहे. त्यांच्या वसूल झालेल्या शेअरचें भांडवल ३,७४,५५० रु. आणि गंगाजळी ५३,२१४ रु. आहे. या सर्व संस्थांनीं मिळून आपली एक मध्यवर्ती सहकारी संस्था स्थापन केली आहे.

---

**हैद्राबाद संस्थानांत गिरण्यांची स्थापना**—हैद्राबाद संस्थानांत कपास मोठ्या प्रमाणावर पिकते, त्याचा फायदा घेऊन तेथें कापडाचें उत्पादन वाढविण्याचें हैद्राबाद सरकारनें योजिलें आहे. त्यासाठी पहिल्या पांच वर्षांत ३½ कोटि रुपये खर्चण्यांत येतील. चालू गिरण्यांची उत्पादनशक्ति वाढविण्यांत येऊन नवीन गिरण्या स्थापन केल्या जातील. त्याकरितां ५ लाख चात्या व ७ हजार माग लागतील. टेक्स्टाइल मिल्स लि. व डेकन एजन्सीज लि. ह्या नांवाच्या दोन कंपन्या स्थापन करून, तिचेपैकीं दुसरीकडे गिरण्यांची व्यवस्था सोपविली जाईल.

**विजय टेक्स्टाइल्स लि. पुणें** – वरील कंपनीस मार्च अखेरच्या वर्षी सुमारें ९ हजार रु. नफा झाला असून ऑर्डिनरी व प्रेफरन्स भागीदारांना ६% डिव्हिडंड मिळणार आहे.


**दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रुपये |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड**

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग

९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५०

**खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व स. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.